# कुलाबा-वांद्रे-सीप्झ

## मेट्रो-3 च्या भुयारीकरणाकरिता लागणाऱ्या टनल रिंगच्या निर्माणास प्रारंभ

मुंबई, 7 मार्च 2017 : सगळ्यांना उत्सुकता लागून असलेला मुंबईतील पहिल्या भुयारी मेट्रो मार्गाचे काम गतीने पुढे जात असून या प्रकल्पाने आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. भुयाराच्या मजबुतीकरिता आवश्यक असणाऱ्या टनल रिंगच्या निर्माणाच्या कामास आज मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे (मुं.मे.रे.कॉ) वडाळा येथील कास्टींग यार्ड येथे सुरूवात करण्यात आली आहे.

भुयारीकरणाकरिता लागणाऱ्या टनल बोरींग मशिन्स (टीबीएम) जुलै 2017 पर्यंत मुंबईत येणे अपेक्षित असून प्रत्यक्ष भुयारीकरण ऑक्टोबर 2017 ला सुरू करणे नियोजित आहे. हा पल्ला गाठण्यासाठी टनल सेगमेंट रिंग तयार करणे आवश्यक आहे. या रिंगमुळे भुयाराला मजबुती येते. या प्रकल्पाकरिता तब्बल 40 हजार रिंग्जची आवश्यकता भासणार आहे. रिंग्जच्या निर्मितीकरिता एकूण 65 साच्यांची आवश्यकता आहे. हे साचे फ्रान्स, कोरिया येथून आयात केल्या जाणार असून काही दिल्ली मेट्रो कडून मागविण्यात येणार आहे. प्रत्येक साच्यात सहा रिंग्स तयार होणे शक्य आहे. रिंग मजबुत व चांगल्या दर्जाच्या असाव्या यासाठी सिमेंटच्या रिंग सहा कास्टींग यार्ड मध्ये तयार केल्या जाणार आहेत. त्यापैकी चार कास्टींग यार्ड वडाळा तसेच दर्गा व जेव्हीएलआर जवळ प्रत्येकी एक आहे.

यासंदर्भात प्रतिक्रिया देताना मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक, श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या की, "मुंबईसारख्या शहरात भुयारीकरण करणे आव्हानात्मक आहे. हे काम अत्याधुनिक तंत्रज्ञान व तज्ज्ञांच्या सहाय्याने मुं.मे.रे.कॉ पूर्ण करेल असा मला विश्वास आहे. या वर्षाच्या अखेर मुंबईत मोठ्या प्रमाणात भुयारीकरणाचे काम सुरू होणार असून मुंबईकरांना कमीत कमी असुविधा होईल याची विशेष काळजी घेतल्या जाईल."

मुं.मे.रे.कॉचे संचालक (प्रकल्प), श्री. एस. के. गुप्ता म्हणाले की आजचा क्षण प्रकल्पाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून मला आनंद वाटतो की आम्ही टनल सेगमेंट रिंग्स ह्या नियोजित वेळेच्या आधी तयार करण्यास सुरुवात केली आहे.

याकार्यक्रमाला मुं.मे.रे.कॉचे संचालक (प्रणाली) श्री. ए.ए.भट्ट, कार्यकारी संचालक (नियोजन) श्री आर. रमणा तसेच मुं.मे.रे.कॉचे वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.